I.O.प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** शहर चौक
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0232 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/07/2023 19:55

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 14/06/2023
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/06/2023
**Time From (वेळेपासून):** 14:50 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:07 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/07/2023 **Time (वेळ):** 19:55 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 040
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/07/2023 19:55 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**
**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर **Beat No. (बिट क्र.):**
**(b) Address (पत्ता):** सहायक पोलीस आयुक्त, शहर विभाग,सिटीचौक,येथील कार्यालयात औरंगाबाद

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** शहर चौक
**District(State) (जिल्हा(राज्य)):** औरंगाबाद शहर(महाराष्ट्र)

**6. Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): महेश मनोज भगत

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 2003

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्रायविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | रेल्वेस्टेशन रोड , बनेवाडी,औरंगाबाद ,शहर चौक,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पत्ता | रेल्वेस्टेशन रोड , बनेवाडी,औरंगाबाद ,शहर चौक,औरंगाबाद शहर,म्हाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7020827019

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक श्री. भागीनाथ अंगुणे . | | | 1. सद्या नेम सहायक पोलीस आयुक्त,, शहर विभाग,, सिटीचौक औरंगाबाद शहर ,शहर चौक,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी खाली सही करणार महेश मनोज भगत वय-20 वर्ष,व्यवसाय-मजुरी रा.रेल्वेस्टेशन रोड बनेवाडी,औरंगाबाद मो. क्र.9665612079; 7020827019.
समक्ष हजर येवुन फिर्याद देतो की, "मी दिनांक 13/06/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद येथे लेखी तक्रार दिली की,: मी वरील ठिकाणचा राहणार असुन दिनांक 06/04/2023 रोजी माझे व माझा चुलत भाऊ मच्छींद्र भगत यांचेशी घरगुती कारणावरुन भांडण झाले होते, माझ्या चुलत भावाने माझ्याविरुध्द वेदांतनगर पोलीस स्टेशन मध्ये 324 चा गुन्हा दाखल केला होता. माझ्या विरुध्द वेदांतनगर पोलीसांनी चॅप्टर केस नंबर 27/2023 दि.19/04/2023 अन्वये दाखल केली होती. मी सदर तारखेला सहायक पोलीस आयुक्त,शहर विभाग, सिटीचौक, औरंगाबाद येथे हजेरी साठी जायचो. सहायक पोलीस आयुक्त,शहर विभाग,सिटीचौक येथील श्री.अंगुणे पोलीसवाले साहेबांनी मला सांगीतले की,सातबारा व घरटॅक्स पावती लागन तेव्हा तुझी जामीन होईल. त्यावरुन श्री.अंगुणे साहेबांना मी म्हणालो की माझ्याकडे काही नाही मी किरायाच्या घरात राहतो अस म्हणुन मी पाच ते सहा तारखा करुन घेतल्या. मला त्रास व्हायला लागल्याने मी पोलीस वाले साहेब श्री.अंगुणे यांना म्हणालो की माझी केस कधी बंद होईल साहेब,त्यावर श्री.अंगुणे साहेब म्हणाले की दोन हजार रुपये (2000/-रुपये) दिले की तुझी केस मिटवुन टाकु.

माझ्या वर कलम 107 अन्वये चॅप्टर केस करण्यात आली होती मी पाच ते सहा तारखेस हजर राहीलो नंतर मी कामानिमीत्त बाहेर गावी गेल्याने तिन वेळेस तारखेस हजर राहीलो नाही त्यामुळे मला खटला क्र.256/2023 अन्वये दिनांक 13/06/2023 रोजी हजर राहण्या बाबत विशेष कार्यकारी दंडाधिकारी,शहर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या सहीचे समन्स देण्यात आले. त्या समन्सची छायांकित प्रत सोबत जोडत आहे.

माझे श्री.अंगुणे साहेबांशी कोणत्याही प्रकारचा देण्या-घेण्याचा व्यवहार नसुन माझी त्यांच्याशी कुठल्याही प्रकारची वैर-दुष्मनी नाही.

उद्या दिनांक 14/06/2023 रोजी मी श्री.अंगुणे साहेबांना भेटायला जाणार आहे. श्री.अंगुणे साहेबांनी मला माझी केस बंद करण्यासाठी दोन हजार रुपयाची मागणी करुन स्वत: किंवा इतरां मार्फत दोन हजार रुपये स्विकारल्यास त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही विनंती".याप्रमाणे तक्रार दिली होती.

माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्रीमती दिपाली निकम यांनी दोन शासकिय पंच क्र. 1 श्री. अतुल भाऊसाहेब पाटील वय-32 वर्षे, व्यवसाय-नौकरी, कनिष्ठ लिपीक, शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद औरगाबाद, रा.न्यु को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी, प्लॉट नं.1, नक्षत्रवाडी औरंगाबाद. पंच क्र.2 श्री.अजय गोपिचंद सावळे वय-26वर्ष, व्यवसाय-नौकरी, कनिष्ट सहायक, बांधकाम विभाग, जिल्हा परीषद, औरगाबाद रा. भास्कर वास्तु सोसायटी, फ्लॅट नं.-D-6, सिल्वर लॉन्स जवळ, तारांगण, पडेगांव, औरंगाबाद असे पंच उपलब्ध करुन घेतले. त्यांच्याशी ओळख करुन दिली.त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीवर मी,दोन्ही पंचानी व पो.नि.श्रीमती दिपाली निकम मॅडमने सहया केल्या.

त्यानंतर पो.नि.श्रीमती दिपाली निकम मॅडम यांनी पंचांच्या समंतीने दिनांक 14/06/2023 रोजी सहायक पोलीस आयुक्त कार्यालय,शहर विभाग, सिटीचौक औरंगाबाद शहर येथे नोकरीवर असलेले पोलीस श्री.अंगुणे,यांची सदर कार्यालयात जावुन लाच मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर पो.नि.श्रीमती दिपाली निकम मॅडम यांनी लाचमागणी कारवाई मध्ये डिजीटल व्हाईस रेकॉर्डर वापरण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे प्रात्यक्षिक करुन दाखवले. मी व माझ्या सोबत पंच क्र-1 श्री.अतुल पाटील यांना सोबत पाठवण्याचा निर्णय घेऊन माझ्या शर्टाच्या खिश्यात डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देऊन आम्हा दोघांना पोलीस श्री.अंगुणे यांची भेट घेण्यासाठी सिटीचौक येथील सहायक पोलीस आयुक्त कार्यालयाकडे माझ्या खाजगी मोटार सायकलने रवाना केले. तेथे पोलीस श्री.अंगुणे यांची भेट झाली. त्यावेळी त्यांनी माझ्याकडे माझ्यावर असलेले कलम 107 अन्वये चॅप्टर केस बंद करण्यासाठी "किती पैसे देतो,

किती देतो" त्यावर मी पोलीस श्री.अंगुणे यांना म्हणालो की माझ्याकडे आता सद्या 500/-रुपये आहे. त्यावर पोलीस श्री.अंगुणे म्हणाले तेवढयात नाही होत, त्यावर मी पोलीस श्री.अंगुणे यांना विचारले की किती लागते मंग, त्यावर पोलीस श्री.अंगुणे म्हणाले की, "दोन-एक हजार" असे म्हणुन पंचासमक्ष 2000/-रुपये लाचेची मागणी करुन ते स्विकारण्याचे मान्य केले. व जामीना करता घर टॅक्स पावती व आधार कार्डची झेरॉक्स मागणी केली त्यावेळी माझ्याकडे सदरचे कागदपत्र नसल्याने मी व पंच ऍन्टी करप्शन कार्यालयात परत आलो.

त्यानंतर दिनांक 15/06/2023 रोजी पो.नि.श्रीमती निकम मॅडम यांनी माझ्याकडे पोलीस श्री.अंगुणे यांनी लाचेची मागणी केल्याप्रमाणे 2000/-रुपये श्री.अंगुणे यांना देण्यासाठी 500/-रुपये दराच्या 04 नोटांना अँन्थ्रासिन पावडरचे प्रात्यक्षिक करुन दाखवुन सदरच्या नोटाना अँन्थ्रासिन पावडर लावुन व नवीन मेमरी कार्ड टाकुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्याकडे दिले. त्यानंतर मला व पंच क्र.1 यांना माझ्या खाजगी मोटार सायकलने श्री.अंगुणे यांची भेट घेण्यासाठी त्यांचे कार्यालयात रवाना केले व आमच्या पाठो-पाठ पो.नि.निकम मॅडम व सापळा पथक आले.

परंतु सदर ठिकाणी पोलीस श्री.अंगुणे यांची भेट झाली नाही व सदर ठिकाणी काम करणारे पोलीस श्री.जाधव यांनी . 26/06/2023 रोजी पुढील तारीख दिली असुन त्या तारखेस ये असे सांगुण जाण्यास सांगीतले त्यावर आम्ही ऍन्टी करप्शन कार्यालयात परत आलो तेव्हा पो.नि.निकम मॅडम यांनी माझ्याजवळ असलेल्या नोटा व व्हाईस रेकॉर्डर काढुन घेतले झालेली सर्व घटना सविस्तर सांगीतली.

दिनांक 26/06/2023 रोजी पुन्हा पो.नि.निकम मॅडम यांनी माझ्याकडे अँन्थ्रासिन पावडर लावलेल्या 500/-रुपये दराच्या 04 नोटा व नवीन मेमरी कार्ड टाकुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्याकडे दिले. त्यानंतर मला व पंच क्र.1 यांना माझ्या खाजगी मोटार सायकलने श्री.अंगुणे यांची भेट घेण्यासाठी त्यांचे कार्यालयात रवाना केले व आमच्या पाठो-पाठ पो.नि.निकम मॅडम व सापळा पथक आले.

सदर ठिकाणी पोलीस श्री.अंगुणे यांची भेट झाली तेव्हा मी म्हणालो की, "दोन हजार रुपये आनलेले आहे, ओ साहेब लई परेशान झालो मी आता" त्यावर पोलीस श्री.अंगुणे यांनी कोणतीही प्रतिक्रिया न देता घर टॅक्स पावती घेऊन ये असे सांगुण दिनांक 04/07/2023 अशी पुढील तारीख देऊन जाण्यास सांगीतले. त्यावर आम्ही ऍन्टी करप्शन कार्यालयात परत आलो तेव्हा पो.नि.निकम मॅडम यांनी माझ्याजवळ असलेल्या नोटा व व्हाईस रेकॉर्डर काढुन घेतले झालेली सर्व घटना सविस्तर सांगीतली.

त्यांनतर दिनांक 04/07/2023 रोजी पो.नि.श्रीमती निकम मॅडम यांनी माझ्याकडे अँन्थ्रासिन पावडर लावलेल्या 500/-रुपये दराच्या 04 नोटा व नवीन मेमरी कार्ड टाकुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्याकडे दिले. त्यानंतर मला व पंच क्र.1 यांना माझ्या खाजगी मोटार सायकलने श्री.अंगुणे यांची भेट घेण्यासाठी त्यांचे कार्यालयात रवाना केले व आमच्या पाठो-पाठ पो.नि.निकम मॅडम व सापळा पथक आले.परंतु सदर ठिकाणी पोलीस श्री.अंगुणे यांची भेट झाली नाही. सदर ठिकाणी काम करणारे पोलीस श्री.जाधव यांनी सांगीतले की तुझी चॅप्टर केस बंद करण्यात आली असुन जाण्यास सांगीतले. त्यावर आम्ही ऍन्टी करप्शन कार्यालयात परत आलो तेव्हा पो.नि.निकम मॅडम यांनी माझ्याजवळ असलेल्या नोटा व व्हाईस रेकॉर्डर काढुन घेतले झालेली सर्व घटना सविस्तर सांगीतली.

परंतु पोलीस श्री.अंगुणे यांची भेट न झाल्यामुळे पो.नि.निकम मॅडम यांनी काही दिवसांनी पोलीस श्री.अंगुणे यांची भेट घेऊन त्यांनी मागणी केल्या प्रमाणे लाचेची 2000/-रुपये रक्कम देण्यासाठी परत जावे लागेल असे सांगीतले.

आज दिनांक 12/07/2023 रोजी पो.नि.श्रीमती निकम मॅडम यांनी माझ्याकडे अँन्थ्रासिन पावडर लावलेल्या 500/-रुपये दराच्या 04 नोटा व नवीन मेमरी कार्ड टाकुन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझ्याकडे दिले. त्यानंतर मला व पंच क्र.1 यांना माझ्या खाजगी मोटार सायकलने श्री.अंगुणे यांची भेट घेण्यासाठी त्यांचे कार्यालयात रवाना केले व आमच्या पाठो-पाठ पो.नि.निकम मॅडम व सापळा पथक आले. त्यावेळी पोलीस श्री.अंगुणे यांची भेट झाली तेव्हा श्री.अंगुणे म्हणाले की आमची केस इथ बंद केली तु यायच काम नाही इथे बाकी तुझे काय दुसरे लफडे असेल ते आम्हाला माहित नाही. त्यावर मी श्री.अंगुणे यांना म्हणालो की, "हे घ्या हे तुम्ही मागीतलेले दोन हजार रुपये". त्यावर पोलीस श्री.अंगुणे यांनी " चल निघ रे इथुन, "असे जोरात ओरडुन, "चल निघ, निघ पटकण" असे सांगुन जाण्यास सांगीतले. त्यावर आम्ही ऍन्टी करप्शन कार्यालयात परत आलो तेव्हा पो.नि.निकम मॅडम यांनी माझ्याजवळ असलेल्या नोटा व व्हाईस रेकॉर्डर काढुन घेतले झालेली सर्व घटना सविस्तर सांगीतली. सदर घटने बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला.

दिनांक 14/06/2023 रोजी 14.50 ते 16.07 वाजेच्या दरम्यान आरोपी लोकसेवक श्री.भागीनाथ अंगुणे,वय-56 वर्ष, व्यवसाय-नोकरी पद-सहायक पोलीस उप निरीक्षक (वर्ग-3),सद्या नेमणुक - सहायक पोलीस आयुक्त, शहर विभाग, सिटीचौक औरंगाबाद शहर यांनी माझ्याविरुध्द खटला क्र 256/2023,पोस्टे वेदांतनगर,चॅप्टर केस क्रमांक-27/2023 कलम-107 सिआरपीसी केस मध्ये जामीन देऊन केस बंद करण्यासाठी सहायक पोलीस

आयुक्त,शहर विभाग,सिटीचौक येथील कार्यालयात पंचासमक्ष 2000/-रुपयाची लाचेची मागणी केली परंतु श्री. भागीनाथ अंगुणे यांना काही तरी शंका आल्याने लाचेची रक्कम स्वीकारली नाही म्हणुन श्री.भागीनाथ अंगुणे, सहायक पोलीस उप निरीक्षक यांच्याविरुध्द फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद माझे सांगणे प्रमाणे माझे समक्ष मराठीत संगणकावर टंकलिखीत करण्यात आली असुन मी वाचुन पाहिली माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष हि फिर्याद दिली सही

दाखल करणार -- पोंउपनि- श्री.गायके

तपास अधिकारी - पोनि श्रीमती दिपाली निकम ने. ला.प्र.वि. औरंगाबाद

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Nirmala Mansing Pardeshi(I (Inspector)) / POBN74842 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

डी.ओ.अधिकारी
पोलीस स्टेशन सिटी चौक
छत्रपती संभाजीनगर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Nirmala Mansing Pa
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN74842